जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 MAY 2023
पुढारी

# शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी एकत्रित काम करावे

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर; आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्घाटन

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा अवलंब करून शालेय शैक्षणिक संकल्पनांचे सुलभीकरण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विशेष ॲप विकसित करून शालेय शिक्षण क्षेत्राला महत्त्वाचे योगदान दिले आहे. येथून पुढच्या काळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यापीठे व शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रित काम केल्यास शैक्षणिक विकास साधणे शक्य होईल, असे प्रतिपादन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या मशालेय शिक्षणात 'आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. जिल्हाधिकारी राहुल रेखावार उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्घाटन करताना शिक्षणमंत्री दीपक केसरकर. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सुधीर देसाई आदी.**

मंत्री म्हणाले, भारताने जगाचे नेतृत्व करावे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व शैक्षणिक व्यवस्थांनी एकत्रितपणे काम करावे. शालेय शिक्षण, तंत्रशिक्षण व उच्च व तंत्र शिक्षणातील सीमारेषा पुसल्या जाणे महत्त्वाचे आहे.

### प्रणाली साकारत असल्याचा आनंद

शिवाजी विद्यापीठातर्फे शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीसाठी ७५.४० लाखांचा निधी जिल्हा नियोजन मंडळाच्या नाविण्यपूर्ण योजनेतून उपलब्ध करून दिला. ही प्रणाली प्रत्यक्षात साकारत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते आ. सतेज पाटील यांनी दिली.

विद्यापीठात ५० वर्षांनंतर आल्याचे सांगून मंत्री केसरकर यांनी विद्यापीठाच्या बांधणीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलणारे आर्किटेक्ट आर. एस. बेरी यांच्या आठवणी जागविल्या.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून विकसित करण्यात आलेल्या या प्रणालीमुळे विज्ञानातील अवघड व क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास त्यामुळे सोपे होणार आहे.

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे डॉ. सुधीर देसाई, डॉ. वैशाली भोसले यांनी आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे सादरीकरण केले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 MAY 2023 तरूण भारत

# आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीतून विद्यार्थी विकास

## शालेय शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री दिपक केसरकर यांचे प्रतिपादन



शिवाजी विद्यापीठातील आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीसंदर्भात मार्गदर्शन करताना पालकमंत्री दिपक केसरकर . सोबत जिल्हाधिकारी राहूल रेखावार, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा अवलंब करून शालेय शैक्षणिक संकल्पनांचे सुलभीकरण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने अॅप विकसित करून शालेय शिक्षण क्षेत्राला महत्त्वाचे योगदान दिलेय. पुढच्या काळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यापीठे आणि शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रित काम केल्यास अधिकाधिक शैक्षणिक विकास साधणे शक्य होईल, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे विकसित केलेल्या 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यवस्थापन परिषद सभागृहातील कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल रेखावार आदी उपस्थित होते. जिल्हा नियोजन समितीच्या वतीने नाविन्यपूर्ण योजना उपक्रमांतर्गत ही प्रणाली विकसित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाला अर्थसाह्य केले आहे. दरम्यान पालकमंत्री केसरकर यांनी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले.

मंत्री केसरकर म्हणाले, शालेय शिक्षण, तंत्रशिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण यांच्यामधील सीमारेषा पुसल्या जाणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखून वयापेक्षा ज्ञानाला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. या आधुनिक प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञानविषयक संकल्पना अधिक सुस्पष्ट होतील. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून ही प्रणाली विकसित केलीय. या प्रणालीमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तीन विषयांच्या १०४ संकल्पनांचे आधुनिक आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाच्या आधारे सुलभीकरण करण्यात आले. विज्ञानातील अवघड व क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे जाईल. ही प्रणाली प्रशासनाच्या सहकार्याने जिल्ह्यातील सर्व शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे डॉ. सुधीर देसाई, डॉ. वैशाली भोसले यांनी आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे सादरीकरण केले. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीची सुरूवात झाल्याचा आनंद**

विद्यापीठातर्फे नाविण्यपूर्ण योजना, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय अनुदान प्रकल्पांतर्गत शालेय विभागात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीसाठी मी पालकमंत्री असताना ७५ लाख ४० हजार रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला. या प्रणालीचा शासकीय शाळेतील इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयोग होईल. ही संकल्पना मांडून पूर्ण करणाऱ्या प्राध्यापकांना शुभेच्छा, या प्रणालीचा वापर इतर क्षेत्रातही होईल.

– सतेज पाटील (आमदार)

0 3 MAY 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा अवलंब करून शालेय शैक्षणिक संकल्पनांचे सुलभीकरण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विशेष ॲप विकसित करून शालेय शिक्षण क्षेत्राला महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे येथून पुढच्या काळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यापीठे आणि शालेय शिक्षण विभाग यांनी एकत्रित काम केल्यास अधिकाधिक शैक्षणिक विकास साधणे शक्य होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार आदी उपस्थित होते.

कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समितीच्या वतीने नावीन्यपूर्ण योजना उपक्रमांतर्गत ही प्रणाली विकसित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाला अर्थसाह्य केले आहे. केसरकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने पर्यावरण क्षेत्रात केलेले काम आणि गेल्या साठ वर्षांच्या वाटचालीत शैक्षणिक व संशोधनाच्या क्षेत्रात सातत्याने उंचावत ठेवलेली गुणवत्ता आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञानातील अवघड व क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास त्यामुळे सोपे होणार आहे. यावेळी डॉ. सुधीर देसाई आणि डॉ. वैशाली भोसले यांनी या आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवपुतळा, ग्रंथभेट व पुष्पगुच्छ देऊन मंत्री दीपक केसरकर यांचे स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

लोकमत

# दूषित पाण्याची तक्रार कुलसचिवांनी केली 'शुद्ध'

## पाणी चांगलेच : अभाविपने केले आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहांसह परिसरात इतर विविध ठिकाणी पुरवले जाणारे पाणी दूषित आहे म्हणून घागर मोर्चा घेऊन आलेल्या अभाविपच्या कार्यकर्त्यांसमोर तेच पाणी पिऊन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी विद्यापीठ चांगलेच पाणी पुरवत असल्याचा पुरावाच सादर केला. पाण्याच्या बाबतीत कोणतीच तडजोड करत नसल्याचा निर्वाळाही दिला.

विद्यापीठातील वसतिगृहांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करत अभाविपच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोर आंदोलन केले. या पार्श्वभूमीवर डॉ. शिंदे यांनी व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य स्वागत परुळेकर यांच्यासह आंदोलकांना सोबत घेऊन विद्यापीठातील सर्व विद्यार्थी वसतिगृहांना भेट दिली. स्वतः पाणी पिऊन शिंदे यांनी वसतिगृहांमध्ये शुद्ध पाण्याचाच पुरवठा केला जात असल्याचे आंदोलकांना दाखवून दिले. तत्पूर्वी अभाविपच्या वतीने घागर मोर्चा काढला. आंदोलनात स्वप्निल पाटील, प्रसाद लष्कर, अद्वैत पुंगावकर, वेदांत कुलकर्णी, श्रेयस पाटील आदींनी भाग घेतला.

### बाहेरून पाणी दिले

पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन वापरासाठी रोज सहा लाख लीटर पाणी लागते. २८ व २९ एप्रिल या दोन दिवशी स्वच्छतेसाठी आर.ओ. प्रकल्प बंद ठेवण्यात आला होता. त्या कालावधीत वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन वीस लीटरच्या ४० कॅन पाणी बाहेरून विकत घेऊन विद्यार्थ्यांना पुरविण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले.

03 MAY 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलसचिवांनी पाणी शुध्दतेबद्दल दिली खात्री

## आंदोलनकर्त्यांबरोबर वसतिगृहे आणि आर. ओ. पाणी शुध्दीकरण प्रकल्पाला दिली भेट

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी वसतिगृहांना शुद्ध पाण्याचाच पुरवठा केला जातो, याची खात्री कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वत: पाणी प्राशन करून आंदोलकांना दिली.

विद्यापीठ प्रशासनाकडून विद्यार्थी वसतिगृहांना खराब पाण्याचा पुरवठा केला जातो, म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली वसतिगृहातील काही विद्यार्थ्यांचा मोर्चा विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीवर काढण्यात आला. काही पाण्याचे नमुनेही कुलसचिव डॉ. शिंदे यांना दाखविण्यात आले. प्रत्यक्षात पाण्याची खातरजमा करण्यासाठी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आणि अधिसभा सदस्य स्वागत परुळेकर यांच्यासह आंदोलनकर्त्यांबरोबर बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयानजीकच्या पाणी शुद्धीकरण केंद्राला भेट दिली. तेथे पाण्यावर नियमानुसार होत असलेली प्रक्रिया दाखवली. त्यानंतर विद्यापीठाचा आर.ओ. पाणी शुद्धीकरण प्रकल्प, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वसतिगृहांना भेट देत सर्व ठिकाणचे पाणी प्राशन केले. तसेच सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर यांनीही पाणी पिऊन आंदोलकांना आश्वस्त केले.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, २८ व २९ एप्रिल दोन दिवस स्वच्छतेसाठी आर. ओ. प्रकल्प बंद ठेवला होता. त्या कालावधीत वसतिगृहातील विद्यार्थ्यांना प्रतिदिन वीस लीटरच्या ४० बाटल्या पाणी बाहेरून विकत घेऊन पुरविले होते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत विद्यापीठ प्रशासन गंभीर असून, कोठेही तडजोड करीत नाही. तरीही काही त्रुटी आढळल्यास विद्यार्थ्यांनी थेट प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात, जेणे करून त्यावर उपाययोजना करणे शक्य होईल, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. या आश्वासनानंतर आंदोलकांचे समाधान झाले.

# कुलसचिवांनी स्वतः पाणी पिऊन पटवली शुद्धतेची खात्री

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी वसतिगृहांना शुद्ध पाण्याचा पुरवठा केला जातो, याची खात्री कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वतः पाणी पिऊन याबाबत आंदोलन करणाऱ्यांना पटवून दिली.

प्रत्यक्षात पाण्याची खातरजमा करण्यासाठी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आणि अधिसभा सदस्य स्वागत परुळेकर यांच्यासह सदर आंदोलनकर्त्यांना सोबत घेऊन पाणीपुरवठ्याच्या विविध ठिकाणांना भेट दिली. सुरुवातीला त्यांनी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयानजीकच्या शुद्धीकरण केंद्राला भेट दिली. तेथे पाण्यावर नियमानुसार होत असलेली प्रक्रिया दाखवून दिली. येथील पाणीप्राशन केले. त्यानंतर विद्यापीठाचा आर.ओ. पाणी शुद्धीकरण प्रकल्प, विद्यार्थी वसतिगृहे आणि विद्यार्थिनी वसतिगृहे येथेही भेट दिली. तेथे विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेले पाणीही त्यांनी प्राशन केले. दरम्यान, '२८ आणि २९ एप्रिल रोजी स्वच्छतेसाठी आर.ओ. प्रकल्प बंद ठेवला होता. त्या कालावधीत वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिन वीस लीटरच्या ४० बाटल्या पाणी बाहेरून विकत घेऊन विद्यार्थ्यांना पुरविण्यात आले होते. सध्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे पाणी आर.ओ.द्वारे शुद्धीकरण केलेले आणि पिण्यास योग्य आहे,' अशी माहिती कुलसचिव डॉ. शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात सोमवारी महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी सामूहिक राष्ट्रगीत, राज्यगीत तसेच विद्यापीठ गीत गायन केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
0 3 MAY 2023
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. महिला कर्मचाऱ्यांच्या लेझीम पथकाने हलगीच्या ठेक्यावर बहारदार लेझीम खेळून कार्यक्रमात रंगत आणली. डॉ. शिर्के यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व पटवून सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.**

## शिवाजी विद्यापीठ

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींसह सामूहिक राष्ट्रगीत, राज्यगीत तसेच विद्यापीठ गीत गायन केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठातील प्रशासकीय कर्मचारी महिलांच्या लेझीमपथकाचा कार्यक्रम मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसमोर झाला. सहभागी महिला कर्मचाऱ्यांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अभिनंदन केले.

0 3 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

**कोल्हापूर :** महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी भगवान कांबळे, प्रांताधिकारी, तहसीलदार, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत राष्ट्रगीत व राज्यगीताचे गायन करण्यात आले. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत राधानगरी-कागलचे उपविभागीय अधिकारी सुशांतकिरण बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



कोल्हापूर : जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहणप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल रेखावार.

## शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवारी महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव विलास शिंदे, अजितसिंह जाधव, श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार, महादेव देशमुख, धनंजय सुतार, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

## ताराराणी विद्यापीठ

संस्थेच्या प्रांगणात सचिव प्राजक्त पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी कमला कॉलेज, डी. एड. कॉलेज, उषाराजे हायस्कूल या प्रमुख संस्थांचे शाखाप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, उपाध्यक्ष एस. एन. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शाहू दयानंद हायस्कूल

आर्य समाज एज्युकेशन सोसायटी संचालित सर्व शाळांत ध्वजारोहण करण्यात आले. मंगळवार पेठ येथील शाळेत शिक्षक व्ही. सी. प्रभुदेसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अमोल पाटील, शिक्षिका कलिकते, मेटील उपस्थित होते.

## स. म. लोहिया हायस्कूल

संस्थेमध्ये आयोजित कार्यक्रमाला ग्रंथपाल मोहन धडेल यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत एस. एस. मिराशी यांनी केले. यावेळी प्राचार्य एस. एस. चव्हाण, ए. एस. सूर्यवंशी, एस. बी. पाटील, एस. पी. कुलकर्णी उपस्थित होते.

## पन्हाळगड

**पन्हाळा :** महाराष्ट्रदिनी पन्हाळगडावरील मुख्य सज्जाकोटी येथे ध्वजारोहण आमदार जयंत आसगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पन्हाळ्याच्या पोलीस निरीक्षक स्नेहा गिरी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी संचलन, मानवंदना दिली. यावेळी प्रांताधिकारी समीर शिंगटे, तहसीलदार रमेश शेंडगे, मुख्याधिकारी चेतनकुमार माळी, गटविकास अधिकारी सुभाष सावंत, विलास तराळ, तसेच तालुकास्तरीय सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रांताधिकारी कार्यालयासमोरील ध्वजारोहण प्रांताधिकारी समीर शिंगटे यांच्या हस्ते पार पडले. तहसील कार्यालय येथील ध्वजारोहण तहसीलदार रमेश शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार विनय कौलवकर, निवासी तहसीलदार अस्लम जमादार, लिपिक शशिकांत सातपुते व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. पन्हाळा नगरपरिषद कार्यालयासमोरील ध्वजारोहण मुख्याधिकारी चेतनकुमार माळी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी नगराध्यक्षा रूपाली धडेल, ॲड. रवींद्र तोरसे, दिनकर भोपळे आदी उपस्थित होते. तालुका वन परिक्षेत्र कार्यालय येथील ध्वजारोहण तालुका वन अधिकारी अनिल मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. पंचायत समिती येथील ध्वजारोहण गटविकास अधिकारी सुभाष सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

पुण्यनगरी



# विद्यापीठ परीक्षा तारखांत होणार बदल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक यापूर्वी प्रसिध्द झाले होते; मात्र विद्यार्थी, पालक, प्राचार्य व शिक्षक संघटनांनी यांनी परीक्षा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरुवात करण्यासंदर्भात विनंती केली होती. त्यामुळे परीक्षांबाबत निर्णय घेण्यात आला असून वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहेत. परीक्षांच्या नवीन तारखा लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.नवीन परीक्षा प्रारंभ तारखा विद्यापीठाद्वारे लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत. परीक्षा अलीकडे होणार आहेत. त्यामुळे परीक्षेच्या तयारीसाठी सुरुवात करण्याचे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.तसेच विद्यापीठाच्या तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरण्यास अडचणी येत आहेत. विद्यापीठाकडून परीक्षा फॉर्म भरण्यास दि. ४ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुढारी

# डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमाला आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. भालचंद्र काकडे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त दि. ३ व ४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता 'डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमाला' ऑनलाईन आयोजित केली आहे. कोव्हिड लस संशोधनात महत्त्वाची कामगिरी बजावणारे जागतिक कीर्तीचे भारतीय शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात व विज्ञान लेखक, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची व्याख्याने होणार आहेत.

सकाळ

# भालचंद्र काकडे व्याख्यानमाला आजपासून

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आणि निपाणीचे सुपुत्र असणारे उदयोन्मुख शास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र काकडे यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमाला' ऑनलाईन स्वरुपात आयोजित केली आहे. गत वर्षीपासून सुरू झालेल्या या व्याख्यानमालेमध्ये यंदा कोविड लस संशोधनात महत्त्वाची कामगिरी बजावणारे जागतिक कीर्तीचे भारतीय शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात आणि प्रख्यात विज्ञान लेखक डॉ. व्ही.एन. शिंदे यांची व्याख्याने होणार आहेत. उद्या, बुधवारी आणि गुरुवारी (ता. ४ मे) सायंकाळी सात वाजता या व्याख्यानांचे आलोकशाही या यूट्यूब वाहिनीवरून प्रसारण होईल.